
REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 3 | DECEMBER – 2017

# उत्तम कांबळे यांचे कादंबरी व कथा लेखन : एक आस्वाद

**प्रा.डॉ.काकासाहेब रामराव सुरवसे**
**सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग प्रमुख,**
**बी. एस. एस. कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय माकणी, ता. लोहारा जि.उस्मानाबाद.(महाराष्ट्र)**

## प्रस्तावना :

उत्तम कांबळे हे मराठी साहित्यातील एक सुप्रसिध्द साहित्यीक, कवी, कथाकार, कांदबरीकार, पत्रकार, संपादक, विचारवंत, सखोल अभ्यासक, परखड वक्ते, संशोधक समीक्षक व सृजनशिल लेखक म्हणून उत्तम कांबळे संपूर्ण महाराष्ट्राला सुपरिचित आहेत. मराठी साहित्यात त्यांच्या विपुल वाडमय निर्मितीने मोलाची भर घातली आहे. उत्तम कांबळे म्हणजे एक चालतं बोलतं विद्यापीठच आहे. समाजजीवनाच्या अंगोपांगाचा सर्वांगीन वेधा घेण्याचे सामर्थ्य त्यांच्या लेखनीत आहे. विषम समाजव्यवस्थेचे चटके त्यांना बालपणापासूनच सहन करावे लागले. घरातील अठराविश्व दारिद्रयावर मात करून त्यांनी आपले जीवन सुखकर बनविले. त्यासाठी अपारहालआपेष्ठा सहन कराव्या लागल्या. यांचे चित्रण त्यांच्या साहित्यातून येते. उत्तम कांबळे यांनी मराठी साहित्य विश्वात आपला ठसा उमटविला आहे. 'श्राध्द', 'अस्वस्थ नायक' या त्यांच्या', कादंबऱ्या आहे. ' हे रंग माणसांचे', 'कथा माणसांच्या', 'कावळे आणि माणसं', 'न दिसलेली लढाई', 'परत्या' इत्यादी त्यांचे कथा संग्रह प्रसिध्द आहेत. 'थोडसं वेगळं', 'कुंभमेळयात भैरू', 'निवडणूकीत भैरू' आदी त्यांचे ललित लेखसंग्रह प्रसिध्द आहेत. 'देवदासी आणि नग्न पूजा', 'भटक्याचे लग्न', 'कुंभमेळा साधूंचा की संधिसाधूंचा?', 'अनिष्ट प्रथा', 'वामनदादाच्या गीतातील भीमदर्शन', इत्यादी संशोधन पर ग्रंथ प्रसिध्द आहेत. 'जागतिकीकरणात माझी कविता', 'नाशिक तू एक सुंदर कविता', हे दोन कविता संग्रह प्रसिध्द आहेत. 'झोत सामाजिक न्यायावर', 'प्रथा अशी न्यारी', 'गजाआडच्या कविता संपादन', 'रावसाहेब कसबे यांचे क्रांतिकारी चिंतन', 'शेतकऱ्यांच्या आत्महत्या : एक शोध' इ. त्यांचे संपादीत ग्रंथ प्रकाशित आहेत. 'डोंगरासाठी काही फुले' हा त्यांच्या अग्रलेखांचा संपादीत ग्रंथ आहे. लढणाऱ्या मुलाखती हा मुलाखतीचे संपादीत ग्रंथ आहे. त्यांचे 'वाट तुडवताना', 'आई समजून घेताना', 'डायरी एका स्वागताध्यक्षाची डायरी' इत्यादी त्यांचे स्वकथनपर लेखन आहे. तसेच 1) नव्या शतकात संत साहित्य टिकेल काय?, 2) राजर्षी शाहू महाराज आणि वेदोक्त प्रकरण, 3) राजर्षी शाहू महाराज आणि महिलामुक्ती, 4) महात्मा फुलेंची जलनीती, 5) जागतिकीकरण आणि दलितांचे प्रश्न, 6) आंबेडकरी संमलेनातील अध्यक्षीय भाषण, 7) कामगार साहित्य संमेलनपातील अध्यक्षीय भाषण, 8) आंबेडकरी साहित्य, 9) सांगलीत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातील स्वागताध्यक्ष म्हणून केलेले भाषण इत्यादी विपूल प्रमाणात उत्तम कांबळे यांचे लेखन प्रसिध्द आहे. नाटक हा वाडमय प्रकार सोडला तर त्यांना मराठीतील सर्वाच वाङ्मय प्रकारात दर्जेदार लेखन केले आहे. हे त्यांचे लेखन त्यांच्या व्यासंगी बहुश्रूत आणि जीवन अनुभूतीचा उत्कृष्ट अविष्कार आहे. उत्तम कांबळे यांची वाटचाल खूप काष्टातून झाली. सांगली –मिरजपासून पंचवीस किलो मीटरवर असलेले कर्नाटकातील शिरगुप्पी हे त्यांचं गाव , त्यांची मातृभाषा कन्नड. त्यांचचं आजोळ कोल्हापूर शिरोळ जवळचं टाकळीवाडी. या टाकळीवाडीतच त्यांचे बालपण गेलं. तेथे त्यांचे सहावी पर्यंतच शिक्षण झाले. सातवी शिरगुप्पीत झाली. हायस्कुलचे शिक्षण बेळगावला झाले. महाविद्यालयीन शिक्षण सांगलीत कमावा



आणि शिका या योजनेत काम करीत वसतिगृहात राहून त्यांनी आपलं शिक्षण पूर्ण केलं. साहित्य लेखनाची प्रेरणा महाविद्यालयीन शिक्षण घेत असतानाच मिळाली. उत्तम कांबळे यांनी आपल्या कथा, कविता, कादंबरी, पत्रकरिता आणि वैचारिक लेखनातून शोषित , पीडित, कष्टकरी, शेतकरी, शेतमजूर, बेरोजगार, कैदी स्त्रिया, देवदासी, भ्रष्ट्राचार, जागतिकीकरण, पाणी आशा विविध विषयांवर व प्रश्नांवर अस्थेवाईकपणे प्रकाश टाकला आहे.

## उत्तम कांबळे यांचे कांदबरी लेखन

मराठी कांदबरी वाङमयाच्या कक्षा रूंदावण्याचे कार्य उत्तम कांबळे यांच्या कादंबरी लेखनाने केले आहे. त्यांनी 'श्राध्द' आणि 'अस्वस्थ नायक' हया दोनच कांदबऱ्या लिहिल्या आहेत.

**1) श्राध्द** :– ही उत्तम कांबळे यांची पहिलीच कादंबरी 1981 झाली प्रसिध्द झाली आहे. आकाशवाणी सांगली केंद्रावर वाचलेल्या कथेवरून कादंबरी लिहिण्याची सूचना अनेकांनी केल्यामुळे उत्तम कांबळे यांनी श्राध्द ही कांदबरी लिहिली. या कादंबरीतून दलित–दलित–सुवर्ण अंतर्गत संघर्षावर प्रकाश टाकला आहे. यात शरणगुप्पी या कर्नाटकातील गावाची कहानी यात आली आहे. पन्नाशी पार केलेले आबा कांबळे हे मुंबईत दीर्घकाळ काम करून आपल्या मुळ गावी येतात. दलितांच्या हिताच्या दृष्टीने, सामान्य माणसांच्या उत्कर्षासाठी, विकासासाठी सहकारी सोसायटीची स्थापना करतात. सहकारी सोसायटीत महारांबरोबरच मांग आणि चर्मकाार समजााच्या लोकांनाही सदस्यत्व देतात. सरकारच्या माध्यमातून सोसायटीला शंभर गाई आणि पन्नास म्हशी मिळतात. त्यांचे वाटप दलित कुटूंबाना होते. दुध वितरणाची जबाबदारी सहकारी सोसायटी घेते. गावातील सरपंच अनागोंडा पाटील दुधाला जो भाव देतो त्यापेक्षा पन्नास पैसे दर जास्त देऊन सोसायटी दूध खरेदी करते. त्यामुळे गावातील सर्वजण सोसायटीत दूध घालतात यातून सोसायटीला व गावकऱ्यानाही फायदा होतो. दलितांना उदरनिर्वाहाचे चांगले साधन मिळते. शेतमजूरांनाही एक पर्याय उपलब्ध होतो. सोसायटी किराणामालाचे दुकान ही चालवते. यातूनही चांगला फायदा होतो. परंतु यामुळे दलित सवर्ण यांच्यात तणाव निर्माण होतो.. गावात दलित पॅथर आणि मास मूव्हमेंट यांची स्थापना होते. पॅथरवाले ग्रंथालयाची स्थापना करतात. आबांचा थोरला मुलगा सोसायटीचे काम बघू लागतो. त्याच्या ढिसाळपणामुळे निष्काळजीपणामुळे सोसायटीची शिस्त बिघडते. सोसायटीचे नुकसान होऊ लागते.

सरपंच अनागोंडा पाटलांच्या घरी लग्न कार्य असते. या लग्नात दलित लोक जेवायला न जाण्याचे ठरवतात. दलितांची पंगत सर्वात शेवटी असते आणि त्यांना उरलेले अन्न वाढण्यात येते. म्हणून काही दलित कार्यकर्ते नाराज असतात. त्या बहिष्कारामुळे पाटील आपल्या शेतावर काम करणाऱ्या दलितांना काम नाकारतो. आणि दलितांवर बहिष्कार टाकतो. त्यामुळे त्यांची उपासमार होऊ लागते. शेतावरून वैरण चारा मिळायचे थांबल्याने दलितांची गुरेही उपाशी राहू लागतात. दुधाचे प्रमाणही कमी होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जंयतीसाठी गावात प्रथमच महार–मांग, चांभार एकत्र येतात. ग्रामपंचायतीच्या निवडणूका लागतात. पाटलांना पुन्हा सरपंच व्हायचे असते. पाटलांचा विरोधक सिध्दा काणे पाटलाविरूध्द उभा रहातो. पाटलांना शह देण्यासाठी व शेतीतील कामे पूर्ण करण्यासाठी दलितांवरील बहिष्कार सिध्दा काणे आपल्यापरता मागे घेतो. गावातल्या दलितांत फुट पडते. आबा कांबळे, यांच्या विरोधात त्यांचा थोरला मुलगा भीमराव उभा राहतो. आबा निवडून येतात, पण अनागोंडा पाटीलचं सरपंच होतो. मिरवणूकीत दगडफेक होते. आबा कांबळे जखमी होतो. त्यांच्या डोक्याला मार लागतो आणि या माराने दोन दिवसांनी त्यांचा मृत्यु होतो. महारवाडयात दोन गट पडतात. कोर्टकचेऱ्या सुरू होतात. सोसायटी डबघाईला येते. गावातील दोन गट मात्र तसेच राहतात. भीमराव आणि आबांचे घर यात दुरावा निर्माण होतो.

पहिल्या वर्षश्राध्दाच्या वेळी थोरला मुलगा भीमराव आबांच्या घरी येत नाही. त्यामुळे सर्वजण अस्वस्थ होतात. 'मोठया पोरानं श्राध्दाचे दोन घास खाल्ल्याखेरीज आबांच्या आत्म्याला शांती लाभलं का? आबांचा धाकटा मुलगा कबीर भीमरावाला भेटतो. त्याचे पाय धरतो, ''दादा आता झालं गेलं सारं विसर आबाचं श्राध्द तू मोठा मुलगा तू दोन घास खाल्ल्याशिवाय त्यांच्या आत्म्याला शांती नाय मिळायची. त्यांचा आत्मा भुतासारखा फिरत राहील. दादा, तुझ्या पाया पडतो. नाही म्हणून नको बाबा"

भीमरावही त्याला प्रतिसाद देतो ''कबीर, मला नाही का समजत? अरं, मी तिकडंच येत व्हतो बाबा''.

आबांचा चेहरा दोघा भावांना खिरीत दिसतो. 'अरं लोकान् आदी तुमच्या भांडणाचं, गटबाजीचं श्राध्द घाला, मग माझं श्राध्द घाला. दुही संपल्याशिवाय कुणाालाच शांती मिळायची नाही. लेकरानु, तुमच्या दुष्मनीच श्राध्द घाला. त्याशिवाय मला शांती मिळायची नाही.'' उत्तम कांबळे यांची ही कादंबरी सामाजिक विषमता, जातीयता आणि भावाभावातील वाद मिटवून दलितांतील गटबाजी संपविण्याचा आणि समाज परिवर्तनाचा स्वभिमानाचा, सामाजिक ऐक्याचा विचार प्रामुख्याने मांडते.

**अस्वस्थ नायक**

अस्वस्थ नायक ही उत्तम कांबळे यांची दुसरी कादंबरी आहे. या कादंबरीचा नायक हा दलित नाही. प्रशांत गोविंद देसाई हा या कादंबरीचा नायक आहे. डी.एड. प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होऊन ही डझनावारी अर्ज करूनही एकाही शाळेत नोकरी मिळत नाही. त्याच्या वडिलांनी दोन एकर शेती विकून शिक्षणाचा खर्च भागविला होता. डी.एड. होउनही प्रशांतला नौकरी मिळाली नाही. त्यामुळे सर्व कुटूंबावरच उपासमारीची पाळी आली. प्रशांत बरोबरचे काही जण शेतमजूर म्हणून गावातच काम करू लागले. आपण डी.एड. आहोत हे विसरून गले. पण प्रशांतला शिक्षक होऊन समाजाची सेवा करायची होती. अनुदानित शाळेत नोकरी मिळत नाही हे बघून विना अनुदानित शाळेत तरी काम मिळविण्याचा प्रयत्न करू लागला. पण तेथेही एकेक लाखाची डोनेशन मागण्यात येते. तेंव्हा तो हवालदिल होऊन गाव सोडून कोल्हापूरला येतो. एका मित्राबरोबर एका खोलीत राहू लागतो.

नोकरीच्या शोधात तो कापड दुकानदारांकडे जाऊन मुलाच्या शिकवणीची चौकशी करतो. दुकानावरील बोर्डावरील शुध्द लेखनकाच्या चुका दाखवून दुरूस्तीचे पैसे मिळवण्याचा प्रयत्न करतो. तेंव्हा दुकानदाराचे उत्तर आम्ही व्याकरणाची शाळा चालवत नाही. चादरी विकतो. लोक येथे व्याकरण पाहून येत नाहीत. चहाच्या टपरीवाल्याला नोकरीची गळ घालतो. तेंव्हा आम्हाला मोठी माणसे नाही, मुले लागतात. असे सांगतो. प्लॅस्टिकचा खेळणीवाला त्याला दोन प्रतिष्ठित नागरीकांचे दाखले आणायला सांगतो. त्यातला एक दाखला शहरातल्या कुप्रसिध्द दादाचा असल्याचे बघून दुकानदार त्याला थारा देत नाही. बिंदू चौकातील मुख्यमंत्र्यांची सभा ऐकून बस स्टॅंडमध्ये बाकावर झोपतो तर पोलीस त्याला पकडून चौकीवर नेतो. फौजदार त्याला ताकीद देवून सोडून देतो. मटकेवाला त्याला चहा पाजून दुकानात आकडे लिहायचे काम देतो. रोजचे शंभर रूपये द्यायला तयार असतो. पण तो दुसऱ्या दिवशीच ते काम सोडतो एका डॉक्टराकडे कंपाउडरचे काम मिळते. पण डॉक्टर त्याला रोज दारूची बाटली आणायचे काम देतात. तेंव्हा त्याचे मन त्याला खावू लागते. पेन विकणाऱ्या रूबाबदार अरूण या मित्राबरोबर तोही ते काम, एक दिवस करतो, दवाखान्यात एका ऑपरेशनच्या वेळी पेशंटच्या पायावरील जखमेवर त्याच्या हातून चिमटा पडतो आणि तेथून त्याला डच्चू मिळतो. गजाननशास्त्री त्याला बाटलीतून तीर्थ विक्री करून कमीशन मिळवण्याचा मार्ग सुचवतात. तीर्थ विक्री हे निमित्त धर्माच सार्वत्रिकीकरण हे खरे उदिष्ट असे त्याच्या मनावर बिंबवले जाते. तीर्थ विक्रीच्या कमीशन मधून बॅगेचे व पिशवीचे पैसे कापून घेतले जातात. आणि हातात फक्त चार रूपये उरतात. दोनच दिवसांनी अयोध्येत बाबरी मशीद जमीन दोस्त होते. आणि कोल्हापूरात दंगल होते संचार बंदीच्या वेळी बाहेर फिरताना प्रशांतला पोलीस लाठीमार करतोत. त्यात तो रक्तबंबाळ होतो. तोंडावर काळया पटया बांधून मौन मिरवणूकीत बोर्ड घेवून तो सामील होतो. रात्री एका बंगल्यापुढे उभा असताना त्या बंगल्याची तरूण मालकीण त्याला बोलावते.चहा देते. रात्री येथेच राहा म्हणते. त्याला स्नान करायला लावते. सेंट लावते. गर्भाश्य भाडयाने देण्याची जाहिरात वाचणाऱ्या प्रशांतलाही बाहुपाशात आवळते, तेंव्हा तो हैराण होतो. तेवढयात दार वाजते.तिचा मुलगा अचानक येतो ती संधी साधून प्रशांत तेथून पळ काढतो. स्वातंत्र्य सैनिकांचे उपोषण, दलित नेत्यांची भाषणे, चर्चामधील फादरचे धर्मांतर बद्दलचे विचार वगैरे अनुभव घेत जनशिक्षण संस्थेत अशोक या मित्राच्या मदतीने नोकरीची ऑर्डरही मिळवतो पण अशोक नक्षलवादी आहे हे कळल्यावर तो त्या नोकरीला नोकर देतो. शेवटी तो एका समाज मंदीरात तो प्रौढांना साक्षर करण्याचे वर्ग सुरू करतो. देवळात शाळा भरवून मुलांना शिकवू लागतो. माणूस बदलायचा असेल तर शिक्षणाची पध्दत बदलली पाहिजे. सगळीकडून पराभूत होत, आपमानित होत, नकार येत असताानाही प्रशांत स्वतःची नैतिकता जपत राहतो. भाकरीसाठी आपला आदर्श सोडायला तयार होत नाही हे त्याचे एक वेगळेपण उत्तम कांबळे यांनी मार्मिकपणे रेखाटले आहे.

बाबरी मशीद उद्ध्वस्त करण्याचा बेत आधी पासून शिजत होता. ते तीर्थ विक्रीच्या संदर्भातील प्रसंगातून वेगवेगळया प्रकारे सूचित केले आहेत्र चर्चमध्ये बोलावून नवे कपडे आणि पोटभर जेवायला देणारे फादर धर्मांतराऐवजी धर्म स्वीकार असा शब्द वापरात समाज सेवेमागचे खरे उद्दिष्ट स्पष्ट करतात. तेच उद्दिष्ट गजाननशास्त्री धर्मक्रांती या शब्दाद्वारे प्रकट करतात. स्वातंत्र्यसैनिक उपोषणाला बसतात. पण रात्री कोणाचे लक्ष नाही असे पाहून उपोषण त्या वेळापुरते सोडत असतात. कामगार नेत्यांची भाषणे, मुख्यमंत्र्यांच्या वक्तव्यातील ढोंगीपणा, दांभिकपणा उघडपणे चित्रीत केला आहे.

उच्च शिक्षण घेऊनही आजच्या समाजव्यवस्थेत पोटापाण्याचा प्रश्न, उदरनिर्वाहाचा प्रश्न सुटत नाही आणि शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचाराने तर धुमाकूळ घातला आहे. त्याच बरोबर शिक्षण घेवूनही नोकरी हाच एकमेव पर्याय अशी मानसिकता समाजाची होणे हे देखिल या शिक्षणाच्या एकांगीपणाचे लक्षण आहे. शिक्षणानंतर आपल्या क्षेत्रात काही तरी करीत राहण्याचा आत्मविश्वास यायला हवा. 'अस्वस्थ नायक' शेवटी देवळात शाळा सुरू करून मुलांना नव्याकाळाला सुसंवादी शिकवण देतो. हेच तो नोकरी मिळणे कठीण आहे असे स्पष्ट झाल्याबरोबर करू शकला असता तर त्यात नेतृत्वाचे गुण अधिकच विकसीत होत गेले असते.

## उत्तम कांबळे यांचे कथा लेखन

कथा लेखनातही उत्तम कांबळे यांनी अन्ययसाधारण कामगिरी केली आहे. माणसांच्या व्यथा आणि वेदना त्यांची कथा व्यक्त करते. मानवी समाजाच्या मांगल्याचा विकासाचा विचार उत्तम कांबळे यांच्या कथा लेखनाचा मूळ गाभा आहे. त्यांच्या कथा संग्रहाच्या नावावरून असे स्पष्ट होते की, त्यांनी माणसांच्या माणूसपणाला अधिक महत्व दिले आहे. 'हे रंग माणसांचे' (1995), 'कावळे आणि माणसे' (1999), 'कथा माणसाच्या' (2009), 'न दिसणारी लढाई' (2008), 'परत्या' (2010) अशा पाच कथा संग्रहातून 98 कथा त्यांनी लिहल्या आहेत.

या कथा संग्रहातून जी माणसे येतात, ती समाजातील, आवती–भवतीच्या विविध स्तरातील आहेत. त्यात तमाशात काम करणाऱ्या स्त्रिया आहेत. लोक परंपरेतील नंदीबैल घेऊन गावोगाव फिरणारा श्रीपती आहे तमासगीर बायकांवर पैसा उधळून कांगाल झालेले पुरूष आहेत. समाजसेवक आहेत, शिक्षक प्राध्यापक आहेत. एकूण माणसांची उपेक्षा करणारे सत्तारूढ सत्ताधीशही आहेत. पोलीस इन्स्पेक्टर आणि पोलीसही आहेत. पोलीस स्टेशनवर पंच म्हणून नेहमी जाणारे आणि स्वतःच्या तोच व्यवसाय करणारे आहेत. मानसिक विकृतीने पछाडलेली आहेत. स्वतंत्र जीवन जगू इच्छिणाऱ्या स्त्रिया आहेत. नवरा सोडून गेल्यावर जन्माला आलेले बाळ विकणारी व पुन्हा मुल परत आणणारी, जगण्याचा संघर्ष करणारी स्त्री आहे. महारोगी, पोरांगा ठार माारून टाकणारी बाई आहे. बायकोला शिकवणारा ड्रायव्हर आहे.

लेखक कवी खरे आणि खोटे आहेत, वृध्द आणि वृध्दाश्रम आहेत. वेडे आहेत पत्रकार आहेत. याबरोबरच कांबळे यांच्या कथांमधून आवती भवतीच्या परिसराचीही चित्रणे येतात. स्मशानातील वास्तवाचे प्रत्यकारी चित्रण ते करतात. समाजाची प्रगती झाली. सुधारणा झाली, ज्ञान विज्ञान आणि तंत्रज्ञान आले तरी माणूस आपल्या नैसर्गिक कृतीमध्ये बदल करीत नाही हे वाचकांना जाणवते. देवदासी समस्येवर रूढी परंपरेवर बेतलेली 'देवाची बाई' ही कथा माणसाचया देवत्वामागे दडलेल्या लैंगिक दैत्याचा मुखभंग करते. माणसांच्या आयुष्यातील दुखाचे, दारिद्रयाचे हृदयस्पर्शी चित्रण उत्तम कांबळे यांची कथा रेखाटते, शोषित, पीडीत, चेहरा हरवलेल्या माणसांचे हे चित्रण वाचकाला अंतमुर्ख करते. जीवनजगण्यासाठी रोज नव्या लढाईला सामोरी जाणारी अनेक व्यक्तीरेखा या कथांमधून भेटतात. युध्दात देशासाठी बलिदान करणाऱ्या सैनिकांच्या विधवांना जगण्यासाठी लढाई विविध स्तरांवरून लढावी लागते. सीमेवर लढणाऱ्या सैनिकांच्या पत्नीच्या भावविश्वात युध्दकालीन दिवसांत घालमेल कशी होते. याचे वेधक चित्र पाहावयास मिळते. जातिव्यवस्था, धर्मव्यवस्था, अंधश्रध्दा, याला बळी पडणाऱ्या समाजघटकाचे प्रत्ययकारी चित्रण उत्तम कांबळे यांनी रेखाटले आहे. गेल्या वीस पंचवीस वर्षातील बदलेले समाजजीवन जागतिकीकरणाच्या विळख्यात सापडलेल्या आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचे गडद पडसाद त्यांच्या अनेक कथांमधून उमटलेले दिसून येते. त्या संदर्भात प्रा.राजेंद्र मुंढे लिहितात की, ''आजच्या परिस्थितीत भरडला जाणारा, सामान्य माणूस सहजीवन, बंधुभाव यांना वंचीत झाालेल्या माणासांचे दुभंगलेले, दुरावलेले मन, अलगपणाच्या जाणिवतेने ग्रस्त झालेला समाज याची विदारक चित्रे लेखकाच्या मनीमानसी रूजली असल्याने विविध भाष्यामधून प्रयत्ययला येत राहते.'' ही उत्तम कांबळे यांच्या कथा लेखना मागची बलस्थाने आहेत. 'अल्पाक्षररमणीयत्व' हा त्यांच्या कथा लेखन शैलीचा विशेष गुण आहे. कथांमधील संवाद सहज उत्कट जसे आहेत. तसेच ते वाचकांना अस्वस्थ करतात. तर कधी अंतमुर्ख करून विचार करण्यास प्रवृत्त करतात. कथेतील वातावरणाचे चित्रण ही कमलीचे प्रत्यकारी रेखाटले आहे. कथेतील व्यक्ती रेखाही वाचकांना परिचयाच्या व आपल्या आवती भावतीच्या वाटतात. त्यामुळे त्यांच्या कथा वाचनीय आहेत.

उत्तम कांबळे यांच्या कथा लेखनाची भाषा शैलीही साधी, सोपी, सरळ व सुटसुटीत आहे. दैनंदीन जीवन व्यवहारात वापरल्या जाणाऱ्या बोलभााषेचा उपयोग करून प्रत्ययकारी चित्रण केले आहे. दुर्बोधता व कृत्रिमपणा त्यांच्या लेखनशैलींला स्पर्शही करत नाही. सहजता हा त्यांच्या भाषेचा गुण आहे. त्यांच्या लेखन शैली संदर्भात प्रा. राजेंद्र मुंढे लिहितात. ''उत्तम कांबळे यांनी साधी लेखनशैली स्वीकारली आहे. साधी, सरळ सोपी लेखनशैली किती प्रभावी असते, याचे प्रत्यंतर त्यांच्या लेखनातून येते. कृत्रिमता नाही, अवडंबर नाही, अलंकारीकतेचा सोस नाही, लेखकाची भाषा कुणालाही पचनी पडेल इतकी सोपी आहे. ही प्रासादीक भाषाशैली आहे.''

जेवढे आतले आहे, तेवढेच बाहेरचेही आहे. बाहय वास्तवाला पचवून त्याचे नवे अन्वयार्थ शोधण्याचा प्रयत्न हे लेखन करते. त्यामुळेच या लेखनामागचे एक सजग मन सतत वाचकांसोबत असते. ते वाचकांचे बोट धरून त्याला या गडद वास्तवांमधून फिरवून आणते आणि वाचकही त्या विश्वात विश्वासाने फेरफटका मारूनन येतो. उत्तम कांबळे यांची लेखनशैली सामाजिक बांधिलकी जोपासणारी आहे.

## निष्कर्ष

1. उत्तम कांबळे यांच्या कादंबरी लेखनानेमराठी कादंबरीत विश्वात मोलाची भर घातली आहे.

2. त्यांचे लेखन हे सामाजिक बांधिलकी जाती भेदावर, मन भेदावर भाऊ बंधकीवर, त्यांची लेखनी हल्ला चढवते.
3. संधी साधू गटबाजीच्या राजकारणामुळे दलितांच्या सामाजिक विकासाच्या संस्था कशा मोडखळीस येतात याचे वास्तव चित्रण रेखाटले आहे.
4. संधी साधू गटबाजीच्या राजकारणामुळे दलितांच्या सामाजिक विकासाच्या संस्था कशा मोडकळीस येतात याचे वास्तव चित्रण रेखाटले आहे.
5. ऐक्यासाठी, दलितांतील मतभेदाचे, गटबाजीचे श्राध्द घालणे किती आवश्यक आहे. याची जाणीव वाचकांना करून देतात.
6. समाज जीवनाच्या सर्वच क्षेत्रातील भ्रष्टाचारावर उत्तम कांबळे यांची लेखनी प्रहार करते.
7. शिक्षणाचा संबंध नोकरीशी जोडला गेल्यामुळे समाजात निर्माण झालेली शिक्षणाबाबतची उदासिनता ही त्याची लेखनी अधोरेखित करते.
8. नैतिक जीवनमूल्यांची शिकवण त्यांच्या साहित्यातून मिळते.
9. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि मानवतावादी जीवन मूल्यांचा पुरस्कार लेखणी करते.
10. माणसांच्या सांस्कृतिक, नैतिक बळाची भाषा तितकीच जोरकसपणे अभिव्यक्त होते.
11. उत्तम कांबळे यांची भाषाशैली ही साधी, सरळ, सोपी आहे. त्यामुळेच त्यांचे लेखन अधिकच प्रभावी झाले आहे.
12. सहजता हे त्यांच्या लेखन शैलीचे विशेष आहे.

## संदर्भ ग्रंथ सूची


1) उत्तम कांबळे, 'श्राध्द' मनोविकास प्रकाशन, पुणे आवृत्ती 3री, 20 जानेवारी 2010.
2) उत्तम कांबळे, 'अस्वस्थ नायक'
3) उत्तम कांबळे, हे रंग माणसांचे (1995)
4) उत्तम कांबळे, कावळे आणि माणसे (1999)
5) उत्तम कांबळे, कथा माणसांच्या (2001)
6) उत्तम कांबळे, न दिसणारी लढाई (2008)
7) उत्तम कांबळे, परत्या (2010)
8) शंकर सारडा – 'उत्तम कांबळे यांचे जीवनस्पर्शी लेखन', 'ललित' मासिक जानेवारी 2011.
9) प्रा.राजेंद्र मुंढे – 'उत्तम कांबळे यांच्या कथा आणि कविता' ललित जनेवारी 2011.